म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. 988

REFBK-0002576
REFBK-0002576

. ग्रं. सं. ठाणें
य काव्य
नं. १७०
सं

जयन्



पुस्तक १२ वें

# कॉलेजियन

कवि

मनमोहन

सदस्य भ्रमरमंडळ

श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स, पुणें.

१९२९

## भ्रमर मंडळ

गोविंद रामचंद्र हिंगणेकर, " सहसंपादक ज्ञानप्रकाश "
गोपाळ लक्ष्मण आपटे, एडिटर कॉलेज पुणें.
विठ्ठल केशव कोरटकर, लंडन.
गोपाळ नरहर नातू, एडिटर हायस्कूल पुणें.
द. गो. दिक्षित, एम्. ए.
एस्. व्ही. आगाशे, बी. ए.
युवराज भोर बी. ए.

( या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन आहेत. )

प्रथम आवृत्ति, १००० प्रती
कापडी बांधणी १० आणे
कागदी बांधणी ७ आणे.

मुद्रक
गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी, श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनिवार, पुणें. नं. २

प्रकाशक
गोपाळ लक्ष्मण आपटे, बी. ए.
सेक्रेटरी-भ्रमर मंडळ.
अशोकव्हिला सदाशिव पेठ,
३२५ पुणें. Y.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे

## समर्पण

आदरापेक्षा अवज्ञा अपेक्षेपेक्षा उपेक्षा
जन्मभर सहन करावी लागूनही
ज्या कविनें काव्यप्रांतात क्रांती
घडवून आणिली त्यां
कै. एकनाथ पांडुरंग
रेंदाळकरांस सादर
समर्पण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५७९
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

श्री. मनमोहन

## यांचें दुसरें पुस्तक

# सुनीत गंगा

यांत मनमोहनांची निरनिराळ्या ठिकाणीं प्रसिद्ध झालेली निवडक सुनीतें ग्रंथित केलेलीं आहेत.

मागविण्याचा पत्ताः—

रा. रा. एस्. डी. वैद्य आणि कंपनी स्टेशनर्स अॅन्ड बुकसेलर्स ३७५ सदाशिव पुणें.

## मंडळाच्या सदस्यांचीं पद्य पुस्तकें

१ ताई तेलीण (दुसरी आवृत्ती)
२ सुनीत गंगा
३ सरलबाला
४ पर्वतीवरून पुणें.
५ बालकाव्य लहरी
६ दख्खनचा वीर (दुसरी आवृत्ती)
७ पावन खिण्ड
८ काव्यकुंज
९ गमावलेलें स्वराज्य व मिळवावयाचें स्वराज्य, स्वर्गाच्या दारात,
१० कुंदाच्या कळ्या

## मंडळाचीं यापुढील पुस्तकें

तेजस्विनी, मदिरा, विहारी, अभंगाचा दुरुपयोग,

# प्रस्तावना.

"Fine writing is, next to fine doing, the top thing in the world."
'—KEATS'

प्रस्तुत पुस्तकाला मी प्रस्तावना लिहावी अशी विनंतीवजा आज्ञा माझे कविमित्र श्रीयुत बाळासाहेब नातू यानी मला केली. आणि भिडेखातर ती मी मान्यही केली. ज्या पुस्तकाचें पर्यालोचन मी सवडीनें करणार होतों तें निकडीनें करणें यामुळें मला भाग झालें. काव्यलेखन चालू असतानांच कांहीं दिवसापूर्वी या काव्यविषयनिरुपणाची कल्पना खाजगी संभाषणांत त्यानी मला बोलून दाखवली होती. कथासूत्रावर जरी काव्याच्या चांगूलपणाचा सर्वस्वी अवलंब नसतो तरी त्यावरून टीकाकाराला त्याच्या उच्चनिचत्वाची स्थूल कल्पना येते. त्यावेळीं त्यानी सांगितलेला विषय मला मृदु-ललित-उज्वल असा वाटला. आणि त्यांना तसें मी बोलुनही दाखवलें. प्रीतिविवाहाची जडण घडण जरी तडका फडकी होत असली तरी पहिल्या वहिल्या नजर भेटीत जडलेल्या माया लोभाचे धागेदोरे मरणानंतरही शाबूत राहतात हें स्वतः निर्माण केलेल्या नायक नायिके करवीं त्यानीं प्रतिपादन केलेलें आहे. बहुजन समाजाला अमान्य असलेलें मत प्रतिपादन करतानां लेखकाची स्थिती वादळँ होणार हें ठाऊक असतांही सागराच्या अथांग पाण्यांत आपली एकशिडी नाव घालणाऱ्या धाडसी तांडेला सारखी असते. मराठी काव्याच्या इतिहासांत भाकरीकरतां जगण्यापेक्षां सौंदर्याकरतां प्राणार्पण करावयास तयार झालेला नायक दृष्टीस पडत नाहीं. मानवी स्वभावाचें निरुपण स्वतःच्या अनुभवाला आलें तसें करणें, जगाच्या दुटप्पीं वर्तनाचे आलेले प्रत्यय छातीठोकपणें कथन करणें वगैरे प्रकार रुढीनें रचिलेल्या एकांगी काव्यशास्त्राला असम्मत आहे. आदर्श काव्य म्हणजे तिच्या मतानें फुलांची पाखरण आहे. सत्व गुणावरच त्यांतील सर्व पात्रांनी निर्वाह केला पाहिजे. समाजाचें सुंदर, मधूर, कोमल, उज्वल—विचारच त्यात ग्रथित केले गेले पाहिजेत. पापपूर्ण मनोवृत्ती-विचाराची अधोगति—या सर्वांना जग पारखें आहे असें दाखवावयाचें. स्वतंत्रवृत्तीच्या कविला हीं साधनें कशीं साध्य होतील. खऱ्या कविचें वर्णन करतांना शेले म्हणतो, दिगंतांत भराऱ्या मारणाऱ्या चंडोलांत आणि कवित अन्तर नाहीं. मनुष्याच्या अंतःकरणांतील उदात्त विचाराचें सकौतुक वर्णन

करताना त्याच्या उन्मत्त विचारांकडे जाणून बुजून दुर्लक्ष करावयाचें ही रीत कोठची ! महाराष्ट्राचें बायरन कविवर्य श्री. रेंदाळकर म्हणतात "ज्या काव्याच्या वाचनानें अंधःकारमय दुःखाची जाणीव जागृत होते तेंच काव्य कविची कर्तबगारी या दृष्टीनें फार योग्यतेचे—"

हें पुस्तक वाचून पाहातांच त्यातील सरस पद रचनां व प्रतिभाचातुर्य इत्यादि गूण पाहून मला खरोखरच कौतुक वाटलें. हिंदूसमाजांतील स्त्री-विषयींचा कल्पनातीत अनादर पाहून

" स्त्री ही केवळ कामतृप्तिकरतां ही कल्पना आमची " असें उद्वेगानें कोण म्हणणार नाहीं ?

निरपेक्ष प्रेमाच्या भव्यत्वाला " त्याची योग्य विशाळता उदधिच्या ना कल्पनेशी जुळे "

सागराच्या असीम आणि अथांग विस्ताराहूनही तें जास्त आहे असें म्हणून त्याच्या सात्विकतेला

"...सज्जन मनाची ये न देता तुला "

अशा रितीचे सोज्वळ उद्गार काढले आहेत. अंतःकरणात पेटत असलेलें विरहदुःख निसर्गाच्या रम्यत्वानें कसें शांत होणार ? असा प्रश्न खालील—

" सारीं माधव, मित्र, इंन्दुनि उषा व्याधी कुला मानसा-
देती निर्मळ सौख्य केवि दुसरी ज्याच्या मनी लालसा ?"

पंक्ति युग्मानें पूर्वापार चालत आलेल्या गैर व्यवहारी कवि संकेताला तें करीत आहेत

काव्योत्पत्तीच्या वेळीं वर्ण्य विषयांत मन तादात्म्य पावलें—निरनिराळ्या कल्पना एकाच वेळीं हृदयप्रागणांत वावर करू लागल्या म्हणजे शब्द-लालित्याकडे आणि वृत्तविषयक नियमाकडे लक्ष कमी जातें. अशा उन्मा-दकारक अवस्थेंत साकीसारख्या धावत्या चालीत रचना करावी असें वाटू लागतें पण सर्व काव्याची गुंफण एकाच वृत्तात करावयाची असे बंधन प्रारंभीं एकसुत्रीपणासाठीं स्वतःला घालून घेतल्यामुळें तसेंहि करतां येत नाहीं. असाच प्रकार झाल्यामुळें प्रस्तुत काव्यांत कांहीं ठिकाणीं यतिभंग झालेला दृष्टीस पडतो. उदाहरणादाखल त्यांचा उल्लेख करण्याचें कारण नाहीं कारण तीं न सांगताही समजून येण्यासारखी आहेत. उच्चारण

सौलभ्यासाठीं मध्यें जी विश्रांति घेतात त्याला यति अशी संज्ञा आहे. यावरून कोणाच्याहि लक्षांत येईल कीं यति ही काव्यवाचकाच्या सोयीसाठीं नसून काव्यगायकाच्या हितासाठीं आहे. नाम, उपसर्ग, विभक्ती, धातु, किंवा अव्ययें यांच्यामध्यें यतिच्या योगानें जेव्हां खंड पडतो तेव्हां त्याला यतिभंग म्हणतात.

या काव्यात जी यतिभंगाची कांहीं उदाहरणें आहेत. त्यात नाम-भंगाचीच प्रायः जास्त आहेत. त्यामुळें दोषाची तीव्रता वाचतांना फारशी त्रासदायक वाटत नाहीं. एकाक्षरी अंत्य यमकाचे रसभंगकारक उच्चाटण झालेलें ज्या वाचकाना मानवते त्यांना या दोषाचा उमजही पडणार नाहीं ही गोष्ट जरी खरी असली तरी दोष तो दोषच.

हिंदुस्तानच्या वीसाव्या शतकातल्या सुशिक्षित समाजातील आचारा-विचाराचें प्रतिबिंब ज्या काव्यात उमटलें आहे असें हें दुसरेंच खंडकाव्य होय श्री. माधवराव पटवर्धनाचें विरहतरंग हें त्यापैकींच एक आहे. त्यांच्या बंडखोर काव्याची रूढिप्रिय छिद्रान्वेषी टिकाकारांनीं उडवडेली दुर्दशा उघड्या डोळ्यानें पाहून धाष्ट्यानें त्यांच्याच पावलावर पाउल टाकून पुढें जाणारा कवी खऱ्या छातिचाच असला पाहिजे. प्रतिकूल टिकेनें हाय खावून मरणारा किट्ससारखा हलक्या मनाचा कवी अशा कामीं निरूप-योगी आहे. श्री. माधवरावांच्या विरहतरंगातील विचाराची पडछाया या काव्यावर फार पडली आहे. कित्येक ठिकाणी असे वाटतें कीं विरह-तरंगाच्या आभ्यासू दृष्टीनें केलेल्या वाचनानेंच या कविला प्रस्तुत काव्य रचनेची प्रेरणा झाली असावी. तसें असलें तरी त्यांत गौणपणा मानण्याचें कांहींच कारण नाहीं, विचाराची स्फूर्ती ही पूर्व कवीपासूनच मिळतें. त्यामुळें स्वतंत्र कल्पकतेला कमीपणा मुळींच येत नाहीं.

नायकाचें नाव शेवटपर्यंत अप्रत्यक्ष ठेवण्यात कांहीं पूर्व हेतु असावा असा संशय येतो. नायक आणि नायिका—प्रमिला हीं पुण्यातील एका विश्वविद्यालयांत सम वर्गांत शिकत होतीं. पुढें सहवासानें त्या दोघांचें एकमेकांवर प्रेम बसतें. प्रेमाचें रूपांतर कलाविषारद म्हणजे बी. ए. झाल्यानंतर लग्नात व्हावयाचें होतें पण नायकाचें म्हणणें

"दोघांची उपजिविका जवरि ना होई स्वयंमनिर्मित

करताना त्याच्या उन्मत्त विचारांकडे जाणून बुजून दुर्लक्ष करावयाचें ही रीत कोठची ! महाराष्ट्राचें बायरन कविवर्य श्री. रेंदाळकर म्हणतात "ज्या काव्याच्या वाचनानें अंधःकारमय दुःखाची जाणीव जागृत होते तेंच काव्य कविची कर्तबगारी या दृष्टीनें फार योग्यतेचे—"

हें पुस्तक वाचून पाहातांच त्यातील सरस पद रचनां व प्रतिभाचातुर्य इत्यादि गूण पाहून मला खरोखरच कौतुक वाटलें. हिंदुसमाजांतील स्त्री-विषयींचा कल्पनातीत अनादर पाहून

"स्त्री ही केवळ कामतृप्तिकरतां ही कल्पना आमची" असें उद्वेगानें कोण म्हणणार नाहीं ?

निरपेक्ष प्रेमाच्या भव्यत्वाला "त्याची योग्य विशाळता उदधिच्या ना कल्पनेशी जुळे"

सागराच्या असीम आणि अथांग विस्ताराहूनही तें जास्त आहे असें म्हणून त्याच्या सात्विकतेला

"...सज्जन मनाची ये न देता तुला"

अशा रितीचे सोज्वळ उद्गार काढले आहेत. अंतःकरणात पेटत असलेलें विरहदुःख निसर्गाच्या रम्यत्वानें कसें शांत होणार ? असा प्रश्न खालील—

"सारीं माधव, मित्र, इंन्दुनि उषा व्याधी कुला मानसा-
देती निर्मळ सौख्य केंवि दुसरी ज्याच्या मनी लालसा ?"

पंक्ति युग्मानें पूर्वापार चालत आलेल्या गैर व्यवहारी कवि संकेताला तें करीत आहेत

काव्योत्पत्तीच्या वेळीं वर्ण्य बिषयांत मन तादात्म्य पावलें—निरनिराळ्या कल्पना एकाच वेळीं हृदयप्रागणांत वावर करू लागल्या म्हणजे शब्द-लालित्याकडे आणि वृत्तविषयक नियमाकडे लक्ष कमी जातें. अशा उन्मा-दकारक अवस्थेंत साकीसारख्या धावत्या चालीत रचना करावी असें वाटू लागतें पण सर्व काव्याची गुंफण एकाच वृत्तात करावयाची असे बंधन प्रारंभीं एकसुत्रीपणासाठीं स्वतःला घालून घेतल्यामुळें तसेंहि करतां येत नाहीं. असाच प्रकार झाल्यामुळें प्रस्तुत काव्यांत कांहीं ठिकाणीं यतिभंग झालेला दृष्टीस पडतो. उदाहरणादाखल त्यांचा उल्लेख करण्याचें कारण नाहीं कारण तीं न सांगताही समजून येण्यासारखी आहेत. उच्चारण

सौलभ्यासाठीं मध्यें जी विश्रांति घेतात त्याला यति अशी संज्ञा आहे. यावरून कोणाच्याहि लक्षांत येईल कीं यति ही काव्यवाचकाच्या सोयीसाठीं नसून काव्यगायकाच्या हितासाठीं आहे. नाम, उपसर्ग, विभक्ती, धातु, किंवा अव्ययें यांच्यामध्यें यतिच्या योगानें जेव्हां खंड पडतो तेव्हां त्याला यतिभंग म्हणतात.

या काव्यात जी यतिभंगाची कांहीं उदाहरणें आहेत. त्यात नामभंगाचीच प्रायः जास्त आहेत. त्यामुळें दोषाची तीव्रता वाचतांना फारशी त्रासदायक वाटत नाहीं. एकाक्षरी अंत्य यमकाचे रसभंगकारक उच्चाटण झालेलें ज्या वाचकाना मानवतें त्यांना या दोषाचा उमजही पडणार नाहीं ही गोष्ट जरी खरी असली तरी दोष तो दोषच.

हिंदुस्तानच्या वीसाव्या शतकातल्या सुशिक्षित समाजातील आचारा-विचाराचें प्रतिबिंब ज्या काव्यात उमटलें आहे असें हें दुसरेंच खंडकाव्य होय श्री. माधवराव पटवर्धनाचें विरहतरंग हें त्यापैकींच एक आहे. त्यांच्या बंडखोर काव्याची रूढिप्रिय छिद्रान्वेषी टिकाकारांनीं उडवेडली दुर्दशा उघड्या डोळयानें पाहून धाष्ट्र्यानें त्यांच्याच पावलावर पाउल टाकून पुढें जाणारा कवी खऱ्या छातिचाच असला पाहिजे. प्रतिकूल टिकेनें हाय खावून मरणारा किट्ससारखा हलक्या मनाचा कवी अशा कामीं निरूप-योगी आहे. श्री. माधवरावांच्या विरहतरंगातील विचाराची पडछाया या काव्यावर फार पडली आहे. कित्येक ठिकाणी असे वाटतें कीं विरह-तरंगाच्या आभ्यासू दृष्टीनें केलेल्या वाचनानेंच या कविला प्रस्तुत काव्य रचनेची प्रेरणा झाली असावी. तसें असलें तरी त्यांत गौणपणा मानण्याचें कांहींच कारण नाहीं, विचाराची स्फूर्ती ही पूर्व कवीपासूनच मिळतें. त्यामुळें स्वतंत्र कल्पकतेला कमीपणा मुळींच येत नाहीं.

नायकाचें नाव शेवटपर्यंत अप्रत्यक्ष ठेवण्यात कांहीं पूर्व हेतु असावा असा संशय येतो. नायक आणि नायिका—प्रमिला हीं पुण्यातील एका विश्वविद्यालयांत सम वर्गांत शिकत होतीं. पुढें सहवासानें त्या दोघांचें एकमेकांवर प्रेम बसतें. प्रेमाचें रूपांतर कलाविषारद म्हणजे बी. ए. झाल्यानंतर लग्नात व्हावयाचें होतें पण नायकाचें म्हणणें

"दोघांची उपजिविका जवरि ना होई स्वयंमनिर्मित

आहे पूर्ण हितावही निवसणें सत्प्रेम या मैत्रित ”

असें होतें. स्वतःच्या उदरनिर्वाहाची काळजी करणें त्याला अपरिहार्य होतें कारण स्वतःच्या प्राप्त परिस्थितीचें निरूपण करतांना

“गेला ठेवुन तो पिता जरि मला लक्षावधी तें धन
चुल्त्यानें कपटीं हिरावुन मला केलें असे निर्धन ”

अशा तऱ्हेचे उद्गार नायकानें काढलेले आहेत. पुढें कांहीं महिन्यानीं उदरानिर्वाहाची सोय लावून तो नायिकेच्या घरीं तिला न्यावयास येतो तेव्हां नायिकेच्या मरणाची बातमी त्याला समजते. ही हृदयद्रावक बातमी समजतांच त्याचें अंतःकरण शतखंडित होतें. त्याच्या मनांत उद्वेग उत्पन्न होतो. त्या उद्वेगाच्या भरांत त्यानें ही विलापिका गाइलेली आहे.

असा या काव्याचा कथा संदर्भ आहे. बुद्धिप्राधान्यापेक्षां भावना-प्राधान्य यांत जास्त दिसून येते. रचनेच्या वेळीं वर्ण्यविषयांशीं स्वतःकवी तद्रूप झाल्यामुळें भाषेला एक प्रकारची गोड प्रसन्नता आली आहे. एकंदर काव्याची रचना इंग्रजी पद्धतीवर म्हणजे भावनात्मक आहे.

आतां थोड्याशा आलंकारीक भाषेत या प्रस्तावनेचा शेवट करावयाचा झाला तर तो असा करतां येईल “या काव्याच्या करुणरसपूर्ण मानससरोवरावर वाचकानां—विशेषतः कॉलेजियनानां—कल्पनांचे राजहंस काव्याच्या शीतल तुषारानीं हर्षपुलकित होत होत गंभीर तत्वज्ञानाच्या कमलततीवर बोधाचा मधूर परागसेवन करीत असलेलें पाहता येण्यास व सरोवराच्या कारुण्य जल-संचयांत यथेच्छ अवगाहन करण्यास समर्थ बनविण्यास हें इतकें पथ दिग्द-र्शनपुरें आहे.”शेवटी श्री.बाळासाहेबानां आदर पूर्वक एक विनंती करावयाची म्हणजे ईषकृपेनें त्यांची सांपत्तिक परिस्थिती परिपूर्ण समाधान कारक आहे. लेखकाला आणि कविला वाङमय निष्पत्तीत सदैव आड येणारी उदर निर्वा-हाची कटकट त्यांच्या पाठिमागें नाहीं त्या परिस्थितीचा फायदा घेवून मऱ्हाठी सारस्वतात त्यांनी अनेकांगी भर घालावी. लेखकांच्या धंद्यांत असेच लोक हल्लीं पडावयास पाहिजे आहेत त्या शिवाय आप्मतलबी प्रकाशकांचा सुळसुळाट कमी होणार नाहीं. इत्यलम्

राधिकाश्रम अमळनेर. }
२२-१२-२८

म. दा आपटे एम्. ए.

# काव्य आणि कवि.

**काय म्यां पामरें-बोलावी सुनीतें-परी दुर्दैवानें-बोलविलें.**

( ज्ञानेश्वर थोडा फेरबदल करून )

प्रस्तुत विलापिका म्हणजे विश्वविद्यालयांतील परीक्षेची काळजी वगळली तर निष्काळजी असलेल्या वातावरणांतल्या सुसंस्कृत सुशील सदाचरणी तल्लखबुद्धीच्या युवकाच्या प्रेमभंगाची करुण कहाणी आहे. प्रत्यक्षाच्या पलिकडील अवकाशांत प्रियकरणीच्या आत्म्याचें वास्तव्य आहे असें कळतांच विभ्रममंदाकिनीच्या पैल तिरावर बसून उदासीन–निराश आणि विरहानें विव्हळ झालेल्या अंतःकरणानें गतकालीन प्रेम प्रसंगाच्या अर्धवट स्मृतीचें महत्त्वाकांक्षांचें सळसळत उसळलेलें विचारतरंग त्या तरुणानें कशा रितीनें गाइलें हें प्रस्तुत पुस्तकांत काव्य रूपानें वर्णन केलें आहे.

ज्याच्या करवी पुढचे सर्व पूर्वप्रसंग वदाविलेलें आहेत तो नायकवर्ण्य विषयाशी तादात्म्य पावलेला आहे. त्याच्या अंतःकरणांतल्या औट तसूच्या जागेंत हजारों क्रांतीकारक विचारांचें थैमान त्यावेळीं सुरू असल्यामुळें– लुसलुशीत वेचक शब्द–पुराण्या पेन्शवर पंडिताच्या मतें सत्काव्यास अत्यावश्यक असणारें शब्दालंकार अर्थालंकार मधून मधून घालून काव्य सौंदर्य वाढवणें अशक्यप्राय होऊन बसलें आहें. या विलापिकेतील आवेशाच्या आवेगांत पुष्कळ रसिकांची अभिरुची प्रवाहपतीत होईल, पण नादमाधुर्याची कोमलतेची चित्रचमत्कारांची अपेक्षा करून जर एकादा तिखट रुचीचा वाचक हे काव्य वाचूं पाहील तर पहिल्या सुनाट निरीक्षणांतच त्याची पूर्ण निराशा झालेलें दिसून येईल. रस्कीननें म्हटल्या प्रमाणें दुःखानें विदीर्ण झालेलें अंतःकरण सुंदर सुललित भाषा लिहूच शकत नाहींत. स्वपत्नीचें शृंगारप्रधान प्रसंग जितक्या उत्कटतेनें त्यानें बोलून दाखवलें तितक्याच जाणिवेनें सृष्टीनिर्माणकर्त्याप्रभूचें अपार सामर्थ्य, अगाध व अगम्य रचना चातुर्य, विशाल व विविधरम्य वैभव इत्यादि उदात्त भावनाचे मनावर झालेले संस्कारही बोलून दाखवलें. कारण काव्योत्पत्तीच्या वेळीं जो भावनेचा उद्रेक होतो तो एकाच तऱ्हेचा असूं शकत नाहीं.

"तत्वाहून तुलाच मान हृदयीं देतो खरा मी स्वतां" असें म्हणणारा नायक तत्वप्रधान नसून बहकलेला बाईलवेडा आहे असा पुष्कळांचा आक्षेप येईल. पण अशातऱ्हेच्या आक्षेपकानी हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं इतर नाट्य-काव्य कादंबऱ्यांत एकसारखा एकजात वावरणारा सर्वगुणसंपन्न नायक हा नसून, ज्ञानाच्या उत्क्रमणावस्थेत नुकताच पदार्पण करूं लागलेला असा एक अभ्यासू आहे.

वर्णविषयाची आणि वर्णित व्यक्तींची तरफदारी केल्यानंतर स्वतः आमच्या बद्दल थोडेंसे लिहावयास कांहीं हरकत नाहीं.

स्वतःच्या करमणुकीखातर रचलेल्या कविता मुंबईच्या करमणुकींत जेव्हां भाग घेवूं लागल्या तेव्हां इष्टमित्रांच्या घरीं क्लबांत आम्हाला "कविराज" या शिवी होवूं पाहाणाऱ्या शब्दानें संबोधण्यात येवूं लागलें. पुढें पुढें या कवित्वाच्या केलेल्या आवास्तवीक आरोपाला वास्तवीक करण्याकरता ज्ञानप्रकाश, स्वराज्य, केसरी, चित्रमयजगत्, नविमौज, आनंद, मनोरंजन, इ० वृत्तपत्रांनीं व मासिकांनीं बरीच मदत केली. परंतु या मदतीच्या मुद्दलावर सुद्धा कवित्वाची खरी पदवी आम्हाला मिळेलच असें नाहीं.

काव्यविषय पूर्णपणें काल्पनीक आहे. आमच्या चारित्र्याशीं त्याचा काडीइतकाही संबंध नाहीं हें ह्या ठिकाणी टीकाकाराच्या दोषैक दृष्टीकडे पाहून सांगणे जरुरिचें वाटतें.

अनेक प्रकारचे काव्यदोष या काव्यात आढळतील, रुचि वैचित्र्यामुळें पुष्कळांना वर्ण्यकथा काव्याला अनुचित अशी वाटेल पण काव्यप्रकाषकार मम्मटानें म्हटल्याप्रमाणें कविदृष्टी आणि कविसृष्टी ही "नियतिकृत–नियमरहिता" अशी आहे.

सांगावयाचे होतें तें सांगितलें; स्वतःच्याच काव्यावर टिका करण्यांत—अगर गुणवर्णन करण्यांत हशील नाहीं. कारण ते ज्या मोलाचें आहे असें आम्हाला वाटतें तें मोल लोकाभिरूची मान्य करीलच असें नाहीं, मग उगाच शब्दविस्तार आणि आत्मप्रौढी कशाला.

मनमोहन.

अशोकव्हिला ३२५ सदाशिव पुणें.

---

# कॉलेजियन

कवि–मनमोहन

## प्रकरण पहिलें.

### इष्कातली माधुरी

१

सूर्याचे कर अस्तमान समयीं गिर्यंकि आरोहुन
कांहीं काळ छपून नंतर पुढें अस्ताचला वेढुन
घेती धाव सहासयुक्त दुसऱ्या गोलाकडे जावया
त्यां ठावा नच भावभेद प्रतिभा तेजास वर्षावया
नित्याचा परिपाठ आवड तुझी–माझी म्हणोनीं असा
कीं जावें फिरण्या हवेंत जिकडे जल्सा नसे फारसा
बोलावें उघडीं करून हृदयें, वाऱ्यावरी डोलत
सूर्याचें प्रतिबिंब देखत नभीं, होणार अस्तंगत
एकादें दुसरें मनुष्य फिरकें लांबून आलोकुनी ।
तूं जावें दचकून, सांगत मला " हा थांबवा बोलणीं "
" कांऽ हो ! " मी पुसतां, निरुत्तरमनीं जावेस तू लाजुनी
अन् गालावरचें गुलाब फुलतें घ्यावेंत न्याहाळुनी

आतां हीं भवतीं गुलाब फुललें आहेत हें काष्मिरीं
तें निर्जिव गुलाब, त्यांत कुठलीं इष्कातलीं माधुरी !

## खालाटीवर

२

दुर्वांचें दळ त्यांत घालुन मधें रानींफुलें रंगित
कोटाच्या मधि कॉलरीत स्वकरें द्यावीस तूं खोवुन
त्याना वास नसे मुळीं तरि तुझ्या येई करस्पर्शनें
प्रीतीच्या मधलें रसायन असें अद्‌भूत संमोहनें
अस्ताच्या पडद्या पल्याड किरणें होतां नभी मैत्रिकी
लागें चंद्र दिपावयास गगनीं उत्तंगसा आशकीं
हो अंधार गडद्, सुरू पलिकडें रानांत कोल्हेकुई
भीती उद्भव होय अन्तरि तुझ्या, भीरुत्व हें शैशवी
कोणाला कळलें न वेळ इतुका गेला भनें रंगुन
लागे पूर्ण समाधि आत्मिय विचारांच्या मधें हा गुण
गेले लक्ष तुझें घड्याळ बघण्या हाताकडें वेधुन,
" साडेआठ, कितीतरी समय हो ! " निर्बूजळी लाजुन;

ती जागा दिसते समोर, हिरिरी येते अतां पाहतां
खालाटीवर* आठवीत बसतो, पूर्वस्मृती दुःखदा

---

## नावेक मी पाहतो

३

भोताली रमणीय वन्य लतिका शीर्षांवरी पेलत
तैशा या मधुगंध वायु लहरी नादावली निर्मित
चाले नित्य विहंग गायन मना दुःखामधें हासवीं
ऐसें रूप निधान जें स्थळ तिथें लोपे स्मृती मानवी

---

* तळ कोकणातील सपाट जमीनीस खालाटी म्हणतात.

वाटेनें परतून जात असतां ठेचा तुला लागती–
--हे ठावूक पुरें म्हणून धरला हातामधें हांत मी
कांहीं गूढ विचार, आजवर जो अस्पृश्य दोघासही
गेला खेळुन अल्पकाळ हृदयीं, ज्याला भुले ही मही
आश्चर्यून चपापुनी निरखिलें मीं चोरट्या दृष्टिनें
तो तोंडावरती तुझ्याहि 'प्रमिलें' मत्साम्य आलेखनें
अन्धारामधिं दाविला पथ तुला मित्रा जरी जन्मता
येते धैर्य परोपकार समयीं, आहे अशी सत्यता

चिंचोळी पदवाट दूर दिसतें, नावेक* मी पाहतो
निःशब्दः पवनावरी विरह हा शांतस्वरें सोडतो

---

## प्रकरण दुसरें.

# ही काय बाई तऱ्हा !

४

पूर्वींचे तुझिया सवे सहलणें सौख्यप्रदायीं किती
इन्दू, प्रत्युश+ पाहणे तुजसवे मेघांबरी, हो स्मृती
अभ्यासामधि एकरूप असतां खोलीमधें तल्लिन
तूं आलीस सताड दार उघडें उद्दामसें ठेवुन
" दारें लावुन आंत कायऽ करतां ? अभ्यास हो चोरुन
जातो जीव उन्हाळुनी चहुकडे उष्मा; हवा येइ न; "
होतें मान्य मला न हे मत, तरी इन्कार केला नहीं
सत्याची प्रतिमाच मूर्तमयि तू वाटे मला निस्पृही

---

* नावेक=नाव. एक=क्षणभर.

\+ पहाट तारा.

तूं तें हें कळतां, " मतें बदललीं कां हो ? अशी आजला
ज्यांचा योग्यपणा अमान्य करतां स्नेह्यांत संतापला
तो संताप कुठें नि तें मत कुठें ? हीं काय बाई तऱ्हा
युष्मद् बुद्धि न ध्येयनिष्ठ दिसतें, बाईल वेडा बरा "

खोली तीच जिथे सुगम्य रसना तूझी मला हांसवी
खोली तीच जिथील वस्तु सगळी चित्तास व्याकूळवी

---

## " माफी कराना गडे ! "

५

मी जावें क्षणि गोंधळून बघुनीं द्व्यर्थी तुझें बोलणें
दृष्टी व्याकुळ होवुनीं क्षणभरें ओलावलीं लोचनें
" तत्वाहून तुलाच मान, " वदलों " देतों खरां मी स्वतां
प्रीतीहून जगात श्रेष्ठ दुसरें कोणी नसे तत्वतां "
रागेजून जबाबलीस, " दिसतां प्रेमामधें प्रांजळ,—
नाहीं संशय, यांत मात्र अगदीं ध्येयामधें दुर्बळ, "
तो आवेश बघून स्तब्ध बसलों सांजावलें वाक्बळ
ये अन्तर्भुत दुःख, धीर सुटुनी डोळ्यातुनी निर्मळ
ज्ञानानें चतुरा तशी करुनिया संक्षेप या गोष्टिचा
औदार्यें सदसद्विवेक मतिनें उच्चारलीं तू ऋचा
" माझी चूक अतां नको विषय तो पस्तावली मन्मती
सर्वांच्या हृदयांत अप्त वसतें प्रेमाभिमान द्युती "

" थट्टा ही रुतलीं अकल्पित तुम्हां, माफी कराना गडे "
" भारी लीन तुझा स्वभाव " म्हणतां तूं घातलें साकडे

---

## प्रकरण तिसरें.

### मानभावी यश

६

आली तार तुला घराहुन मधें " आई अजारी तरी–
यावें, भेट तुझी तिची न घडणें त्यावीण कालांन्तरी "
चित्तीची विमनस्कता छपवुनी तू दाविली ती मला
दुःखान्ती मन संयमास दुसरी नाहीं कशाची तुला
" चिंता ना करि, मी सवेंच तुझिया येतो कृपावांच्छिणी
आले संकट तें निवारण मला जास्ती परिक्षेहुनी
देतू यांस तुझी प्रसंग बघुनी दुष्प्राप्य पर्वानगी
होणारें घडतें, प्रयत्न करणें श्रेयस्करा दुर्भगीं "
गेलो आणि मिळून सोच्छुक तुझ्या मातेस सेवावया
येती सज्जन धावुनी निवरण्या आघात सर्वाश्रया
आले सत्वर शुष्श्रुशेस अपुल्या तें, मानभावी यश
देवांच्या करुणेस लागत असे यन्तादिचें आमिष

प्रीतीची लतिका फुलावत अशीं दैवी प्रसंगामुळें
पूजी मी भग साभिनंदन तदा अज्ञात् भविष्यामुळें

---

### लीलेचा सहकार.

७

झाली ओळख यांमिषें जननिची भाषापटु प्रेमला
आलेल्या अतिथीस विस्मित करी, निस्सीम ती स्नेहला
लीला जी तव तान्हुली बहिण तीं ओजस्विनी बोलकीं
जीते पाहुन पावन क्षणभिही होईल दुःपातकी

पितृव्यापक स्नेहभाव दिसला नाहीं तिला जन्मता
प्रेम:शांति तुझी तशी जननिची, लीलेस भासे सुधा
माझ्याशी वच बोबडें वदुनिया सांगे प्रशंसा तुझी
" ताई फारच शाहणी, जशि खुले रत्नामध्यें मर्गजी "
लीलेचा सहकार, प्रेम बढवी माझे तुझ्या ठायिचे
गुन्ते चित्त गृहामधें, विसरुनी आव्याप तें मागचे
तेज:पुंज तुझ्या मुखच्छबिवरी कर्तव्यनिष्ठा दिसें
व्याजोक्ति मय हास्य दर्शवि मला, " आतां परिक्षा असें "

वर्षे काय परंतु लोटुन जरी गेले पुढे हें तप
नाहीं मी भुलणार जोवरि नये सर्वेष सव्हारक

---

## प्रकरण चवथें.

## क्रिकेटचा सामना.

८

कॉलेजांतिल वादवाक्पटु अशी माझी असे अंस्करा
पूर्वीपासुन शिश्यवृत्ति बिरुदें सारीं मिळाली मला
अभ्यासामधि तज्ञ आणि इकडे खेळामधेही पुढें
उच्चस्थान समर्पिती कधिमधी झुंजामधें बापुडे
होतो एकदिनी विधायक अशा संघादिचा नायक
तूं उत्कंठ पहावयास्तव तिथें दृष्टीस आकर्षक
खेळाची सुरवात वीस मिनिटें होण्यास संधी असे
हे हेरून तुझ्या नजीक सहजी ओढावलो राजसे
येमूकत्व मनास पाहुन प्रतिस्पर्धी विराटासम
दंभाहंकृति पार लोपुन जयासाठींच हो संभ्रम
तूं निर्व्याज मनें हंसून म्हटलें "ईर्षेत हे तों नही
धीरोदात्त मनास भीति शिवें काळापुढें प्रत्यही "

झालेला हतवीर्य पार्थ उठला गितामृतें संगरी
बुद्धिभ्रंश मया अचेतन, तुझी निर्लेपवी वाक्सरी

२५७६

## परप्रकाशित कीर्ति.

९

आला धीर तुझ्यामुळें प्रगटलें शौर्यस्वकार्यें मधी
"जिंकाया कवळीन डाव "म्हटलें" "आपद् सहस्त्रावधीं"
हें ऐकून सबाष्प लोचन पटें तेव्हां पुसोनी हळू
तूं मंजू वच गुंजलीस मजला देता न कांहीं कळू
झाली वेळ निवासकूट त्यजुनीं आलें गर्डी रंगणीं
खेळाच्या मधि आपुली प्रविणता दावावया भाजनीं
येतां नंबर पातलो धरुनिया हातामध्यें बॅट मी
देवा नंतर आठवून तुजला चित्तामधें कां ! नमीं
टाळ्यांचा रव कर्ण रंध्रि घुमला. चोहींकडोनी जनीं
त्या साऱ्यातुन ऐकु मात्र मजला आला तुझा चिद्ध्वनीं
गेलेल्या विजयास मी फिरविलें बाहू बळे संगरी
जी ती कौतुक दृष्टिनें मजकडे आलोकिती हासरी

माझें श्रेय नव्हे, तुझ्या समयशा तें वाग्कुठारा असे
अर्थानर्थ करून लोक करती, ती कीर्त माझी नसे

## सारंगी वादन.

१०

मेघानी घन कृष्णरंग पटले अस्मान आच्छादिले
चंपेनें चपळाइने चमकुनी चंदेर तें छेदिले

वाटे घातक, त्या खुल्या निवसणें मैदान मध्यामधें
तो उच्चेस्तर मेघनाद, घडकी देई मनीं त्यामध्यें
होई पूर्ण पराभव प्रभुकृपें त्या शूर संघादिचा
सन्मानार्थ मला सभेंत दिधला, पेला कुणी चांदिचा
कोणी ब्याट, सुवर्णलेप पदकें दावावया गौरव
चैतन्यद्युति देइ लास्य तव गे, माझ्या शरीरीं नव
सर्वांच्या वतिनें मनोहर वचें आभार मानूनिया
माते मान दिलास अन् विनविलें, तूझ्या घरीं यावया
नेवोनी अपुल्या गृहीं रिझविले पेटीवरीं गाउन
केले मीहि तुझ्या खुशीस्तव तिथें सारंगिचें वादन

स्वप्नी ध्यानिंमनीं सदैव करतों या गोष्टिची चिंतना
माळेचे मणि ओढतो करुनिया नांवें तुझी घोषणा

---

## प्रकरण पांचवें.

# गडकऱ्यांचें गुलाबी कोडें.

११

आहे आज सुधासुषुप्तिवष ही सालंकृता शर्वरी
व्योमाच्या कुहरातुनी चमकल्या तारा सहस्रावरी
कृष्णस्निग्ध विशाल केश सगळे पाठीवरी सोडुन
अभ्यासामधि गर्क पाहुन तुला मी हांसलो लांबुन
" या आलांत कसें, अकल्पित इथें कांहीं असों कारण
याचा अर्थ कळेन अप्लहि मला सांगा जरा वाचुन "
केलें, ' डॉन ज्युऑन ' काव्य पुढती शृंगार पर्मावधी
पंक्तीं पंक्तिनी अथांग भरली यांही रसाची नदी

मी मदस्मितयुक्त " काय, पुसलें, घेशी परिक्षा अशी
कांहीं गूढ विचारुनी गवसणी घालावया पाहशी"
हटी फार परंतु, आग्रह तुझा मागें हटेना मुळीं
माझेंहि मन भावशील, खुडली आशा तुझी आवळी

" कानाशीं कर तोंड , अर्थ तुजला खोलून मी सांगतो, "
भोळी तूं, करता असे, गडकरी कोडें गुलाबी सुटे

---

# गुड्नाइट.

## १२

हे निर्हेतुक प्रेमवेड अपुलें राहील कांहीं पुढें ?
"ही शंका सुचली तुला भयभरें काळीज माझे उडे
दोघांच्या भवितव्यतेत लिहिले आहे विधीनें कसे
हें अध्याहृत वर्तमान समयीं दोघासही राजसे "
" आहे मूढ खरा--नि अज्ञ पुरतां विश्वामधें मानव
त्यांतें प्राप्य परावलंबन जरी ओलांडलें शैशव
सत्प्रीती नच ठावि त्यास वरवें स्वेच्छेपरी वर्तन
स्त्री मैत्री करणें न त्यास रुचते दोषैक त्या बंधन "
"आहे सत्य" तुझे विचार पटुनी तात्काळ उद्गारलो
दोघांचें मत एक तेथ पडतो सानन्द उल्हासलो
आला पाऊस तो मध्येंच सरले त्या रात्रिचे मौजणे
जातानां घुमली उदीरित तुझी माझी यशःचिंतनें

मागें अन् मुरडून मान वदली वाणी तुझी सुस्वर
' जावो रात्र खुशाल ' तें श्रवुनिया संतोषलें अंतर

---

## प्रकरण सहावें

## नवा पाहुणा.

१३

होता तो रविवार आज नव्हते कॉलेज अन् वाक्‌रण
गाणी मंचर गात कांहि करिती रंगूनीया नर्तन
संगीतामधलें न अक्षर जया विज्ञात त्यांचा स्वन
होणें केवि बरे अजाण नच मी माझे मनोरंजन
टाळाया चिरचीर ती तुजकडे आलों अघाशी मने
तूं होतीस चहा करीत म्हटलें, "आलें नवे पाव्हणे"
"ती खुर्ची तिकडे समीप न बसा अभ्यागताचीच ती"
कोटी सुंदर ऐकुनी क्षणपडें माझी मला विस्मृती
कांहीं उत्तर पाहिजेच दिधलें, झालों त्वरें बोलतां
होती संस्कृत उक्ति ठाऊक मला लोकेश्वरी वाच्यता
"शक्यो वारयितुः करप्रहरतो न त्वाननं जल्पतां"
"भाषाप्रौढ" मला किताबि दिधलीं तूं हीच सार्थक्यता

तेव्हां हास्य मिषे निरुत्तर मला केलेस एका क्षणी
दैवी कांहि तरी तुझ्या प्रगटली नैनामधें मोहनी

---

## नौरोजी आणि टिळक.

१४

दैवाचा सहजी विवाद झडला संभाषणौघा मधें
"दैवाचा बडिवार फार न मुळीं चाले विधीच्या पुढें
ज्याला दैव म्हणून सूज्ञ वदती ते तो प्रभू निर्मित
त्याच्याशी नरयन्त केवि टिकणें होडी जशी सिंधुत

दौर्बल्यें परदास्य दुःसह धुरा अंगावरी ही नसे
नौरोजी, टिळकादि भक्त झटले का ? त्या मिळाली यशे
"नाहीं" उत्तरलो "तुझेंच म्हणणें आहे खरें मानिनी
यत्नाच्याहुन दैव श्रेष्ठ भजणे त्याला प्रयत्नांहुनी"
" झाला गार चहा " नवीन वदनी गंभीरता आणुन
घ्या घ्या लौकर" तूं म्हणलिस जरा गालामध्यें हासुन
त्याच्या वर्णन मी करीत रुचिचें हर्षान्वित प्राशिला
ते सारें मज रम्य, प्रीय सखिचा ज्याला करस्पर्शला

डोळे घट्ट मिटून-चित्र प्रमिले रेखांटतो अन्तरी
निभ्रातः प्रतिमेमधी पण कशी येईल ती माधुरी

---

## प्रकरण सातवें.

## टिळक टँक

१५

सुट्टीच्या दिवसांत बेत ठरला येत्या उन्हाळ्यामधें
पोहायास तुला स्वतः शिकवणे मोठ्या तलावी सुधे
उल्हासी तव वृत्ति पाहुन मनीं झाली स्मृतीं राणिची—
—झाशीच्या, समरूप डौलहि ढबी चालावयाची तुझी
भोंतालीं जनसमुद्दांत करतीं माझी कुचेष्टा कुणीं
लोभाखातर-ती असह्य तरिही मी ठेविली ना मनीं
हाताच्यावर एकल्या सुममृदू काया तुझी पेलुन
वेगानें जल कापुनी पलिकडे न्यावें तुला झेलुन
आरंभीं करुणस्वनें विनविशी ' पाणी जिथें अल्पसें
न्या तेथें ' पण तो सराव पडता भीती तुलाही नसे

घावाघाव करून जीव श्रमतां माझा कधीं पोहता
प्रेमदृष्ठि सुधा प्रशांत मजला अर्पुन दे शांतता

दृष्टीतील तुझ्या मनोहर पडे माझ्यावरी मोहनी
नाहीं ठाऊक अन् निशायत मला—का ? लागलो चिन्तनीं

---

## प्रेमाची परीक्षा

### १६

माझें प्रेम बघावयास्तव, तिथें नाहीं कुणी प्रेक्षक
ऐशी संधि, मधें भरें जल जिथें गेलीस ना रक्षक
आक्रदून मला भयानक रवें तू हाक तैं मारलीं
मी ही शब्द सहानभूति दिधलीं आणी उडी टाकली
तोंडाची टकळी सुरूच असतां पाण्यामधें पोहत
" आलों अप्ल सुधा नको भय, रहा मृत्यूसवें झुंजत'
शक्तीचीं करुनी शिकस्त तुजला बाहेर मीं काढलें
कानाशीं बिलगून गुह्य मनिचें तू तेघवा फोडिलें
ज्वानीच्या बहरामधें उसळुनी मी घेतले चुंबन
अ भिंगातून दृष्टिची किरणभा तूझ्यावरी बर्सुन
तू ही जाणून प्रेम--घेवुन दिलें इन्कार केल्याविणा
सान्निध्यातच संगमांतिल मजा, ही आपुली भावना

आतां दर्शन भाषणाविण तुझ्या दोरंगि विश्वामधें
रानांतील फुलामुळां पटवितो प्रेमातल्या गफ़्ती

---

## प्रकरण आठवें

# शेलेचे ॲडोनाइज

१७

स्वप्नीं गाढ निमग्न निद्रित अशा वेळीं तुझी आकृती
अंतःचक्षुपुढें विलोल दिसली, आश्चर्यली मन्मती
नावें हाक हळूच मारत तुला मी जाहलों जागृत
निद्राभंग न जाणत्रें पण तुझ्या हो साहचर्यीं वध
गेली झोंप उडून लावुन दिवा मी बैसलो वाचित
शेलेचे मधु भावगीत प्रिय जें सर्वांमधें अदभुत
शब्दांची रचना मुलायम तसें तें अर्थ गांभिर्यही
वाटे येवुन शारदाच रमणीं काव्यें अशीं ही लिही
झाली रम्य प्रभात बिंब रविचें बारीतुनी पाहिलें
रक्तन्सात नभी न ' मंगळ, गुरू, स्वाती, शनी झोपले
होई ग्राम पथातुनी फिरूनिया जायें सुरू सारखीं
केले पुस्तक बंद, झोप पुरतीं होतीं मला पारखी

शेलेचा नव ' काव्यसंग्रह ' पडे मेजावरी, तो अतां
ती काव्यात्म ' विलापिका ' रडविते, मानी मनां दैन्यता

---

# जखमी सावज

१८

स्वप्नाचीं सगळीं कथा लिहुनिया तात्काळ मी टाकली !
माझी मीच पुन्हा मनी सकळ ती लक्षूनिया वाचली !
भासें ती प्रतिभायुता, प्रगटली दैवी गुणातीतता
आस्वर्गांतुन ओतली जणु कुणी लेखामधें रम्यता

माझ्या काव्य कला विहीन हृदयीं, स्फूर्ती कशी जाहली
अधःकार, द्युतीविहीन हृदयीं केवि प्रभा फाकली
अन् ह्या नीरस जीवनी सरसता केंव्हां कुणी ओतली
सांगू मी तुजकाय ? ओळख नका ? अभ्यंतरीची दिली
माझे प्रेम किती तुझ्यावर असें, हे बोलताही नयें
त्याची योग्य विशाळता उदधिच्या ना–कल्पनेशी जुळें
ज्याच्या सात्विकतेस सज्जन मनाची ये न देता तुला
उल्लेखून असे हवेच पण कां ? सांगावयाला तुला

तू माझ्यावर भावबद्धनयने दृग्बाण संधानिले
जखमी सावज जाहले, नहि तुझ्या दुर्दैव घातामुळें.

---

# कामी स्वताम्पश्यति

॰ १९

काहीं दुःख तुझ्या मनांत अथवा कायेवरी उद्भूत
होता, त्या गुरूवेदना प्रगटती माझ्याप्रती झेपत
शोकव्याप्त मन प्रसून तव हे कोमेजता तत्क्षणीं
भक्ताला तुझिया न चैन पडणें धावेल संव्हारणी
आल्या चक्षुमधें विकार यमुना त्या आत्म तंद्रीमधें
दुःखाची लवकल्पना न सहते, नाजूक प्रीतीमधें
निस्तब्धध्वा जलवाहिनीत पडता तो शैलरेणू, जसा
ये कल्लोळ, तरंग, पृष्ठ वसना छेदून, वायू तसा
शब्दज्ञान अपांग माय–प्रतिभा तूझी प्रशंसा वदे
तो दारावरती हळूच टिचकी अन् माझीया हाक दे
' झाला हाय विनाश ' मी मनि म्हणे ह्या विघ्नकर्त्यामुळें
नाहीं ती कसली उपाधि सुचते वेडे कसें हें खुळे

हा त्याचा न गुन्हा, परंतु प्रमिले ' कामी स्वभामुपश्यति
स्वस्त्री म्हैषसमान, कामुक म्हणे होतो प्रतापी रती '

मराठी ग्रंथालय ठाणे
ग्रं. क्र. ........
स्थळ प्रत

## प्रकरण नववें

# कायैक सौभाग्यता

२०

" मी झालें अगदीं अधीर तुझियासाठीं चिरःसंगमा
अभ्यासामाधि लक्ष राहि न मुळी, चिंता करी न क्षमा
आयुष्यातिल धन्य तोच दिन कीं, होवू सुखी आपण
दोघांच्या हृदयांत एकच छटा लेपून तूं मी पण
माझ्या सन्निध राहुनी सुखविशी प्रेमामृतें आपुल्या
चित्तींची रुचि देवताच ' प्रमिले, ' संबोधितो मी तुला
भट्जी साक्ष परंतु लग्न अपुलें झालें नहीं केवळ
लोकांचें मन काकशील म्हणुनी निन्देस येते बळ
सौंदर्यांकित चंद्रमा चमकतो दीपगृहाच्या सम
आनंदी फुलपाखरें पहुडली, शय्या तयांची सुम
आणि सुंदर निर्मलांबु सरिता पूर्वेकडे धावते
देखावा सुखदायि हा जरि तरी मत्‌चित्तना वेधते "

आशा मावळली, निराश मन हे झाले उदासी अतां
डोळ्यातील प्रभा शुभा हरपली कायीक सौभाग्यता

## शुभं--अशुभम्

२१

"सारी माधव, मित्र, इंदु नि-उषा व्याधीकुला मानसा
देती निर्भेळ सौख्य केवि ? दुसरी ज्याच्या मनी लालसा
नाना यत्न करून आजवरमी जें प्रेम संपादिले
त्यांच्या शाश्वततेस पूर्ण जमणें त्याविण कैशी फळें
बोलू आज उद्या तुझ्या जवळ हें गेलें अशानें दिन
झाला, ना, पण धीर, गोष्ट मनिची गेली मनीं राहुन
आतां मात्र रुतें कलंकित असें हे शल्य रात्रंदिनी
अन् मी यास्तव आज निश्चयबळें तें टाकलें बोलुन"
गाढालिंगन देवुनीं निजकरें प्रेमें मुखा चुंबुन
सारे मान्य मला म्हणालिस हळू, बोलाल जें आपण
मी मागून चपापुनी निगटुणी निर्भान्तिले चुंबन
होता ती स्मृती आज अश्रु गळतीं तात्काळ डोळ्यातुनी

•

अर्धोन्मीलित ओठ जेथ भिडले ते हे शुभं कातळ
आशेची कळि रम्य जेथ खुडली, तें हें स्मशानी स्थळ

---

## शुभाचे ध्वनि

२२

माझी तू प्रिय धर्मिणी प्रिय तुझा मी नाथ झालों मनें
चंद्राला वर साक्ष ठेवून तुला स्वीकारिले शोभने
भारद्वाज वडा वरी बसुनिया गाई शुभाचें ध्वनी
अन्तर्पाट धुकें शशीभट धरी जोश्याकरें ताणुनी

पक्षांचे मधु मंगलाष्टक पुरें होता रवीनें पट
नेला ओढुन रुपपाहुन तुझें मी जाइलों लंपट
काळ्या रेशिम पातळातुन भुरी काया दिसे अन्धुक
ये सौंदर्य उसासुनी मज गमे देवी कृपाकारक
कर्णी मुक्त कुडी गुलाबगजरा दे रम्यता अंचळा
तत्शोभा असिमा, विलोकुन अगा शृंगार कल्लोळला
स्वत्वाचा अभिमान लोचनउजी* विस्तारुनी दाखवी
विद्येची सुषमा मुखावरि तुझ्या गांभिर्यता रंगवी

गात्रांची हिरुनी सुरेखिव तऱ्हा मी जाइलो कामुक
ठेवी मी दडवून खोल हृदयीं जे दृश्य, हो अन्धुक

---

## भोगैक दृष्टी.

२३

चंद्राची उपमा मुखा न जुळतें त्याची कलंकी छबी
कोकीळेंसम जो तुझा स्वन तया केवी म्हणू दिल्रुबी
वाऱ्याच्यावर अंगवस्त्र विहरें अव्हेरूनी बंधन
ज्यातें सावरण्या करांगुलिमधें संकोचिले गुंतुन
सृष्टीची मधु निर्मिता असशि वा वाक्‌देव तू शारदा ?
कां त्या मन्मथ पंचबाण ततिची काया तुझी कामदा ?
रंभा उर्वशि वा भवानि विजयीं संक्रान्तिची देवता
देशोद्धार करावया प्रगटली, स्वीकारूनी ग्राम्यता
येतां ही नव कल्पना तुजपुढें मी नम्र झालों सवे
हे देखून दया निदर्शक तुझ्या गालामधें हांस ये

---

* उजेड.

भोगैक प्रिय दृष्टि लोपुन तिथे ये सभ्यता पूर्विची
स्त्री ही केवळ काम तृप्ति करतां हीं कल्पना आमुची

ही सांसर्गिक दृष्ट संयम बळें लाथाडली तेधवा
खाली घालुन मान मी तुजवदें "वर्धिष्णु माम् वैभवा

---

## प्रकरण दहावें.

## रुचि वैचित्र्य.

### २४

नातें आजहि मित्र–मैत्रिण असें दोघें मनें मानितो
जों थोडा सहवास नित्य मिळतो त्यानें सुखीं राहतो
शीलभ्रष्ट विचार संयमबळें दुर्वार संव्हारितो
अभ्यासांत सर्वे विहार करतां हा जीव आल्हादतो
शेलेची कविता मला प्रिय तुला वाटे खरा मिल्टन
"ती भावोत्कटता सफाइ सुषमा भाषेमध्यें अल्प न
–त्याच्या त्या कवितेत आणि तुजला तो आवडे कां बरें?"
या प्रश्नास दिलेस उत्तर "रुची वैचित्र्य आहे खरे
'वी. सी. गुर्जर' आवडे तर कुणा 'खांडेकरांची' कथा
कोणाला इडपादि गद्य कविची उद्दाम अश्लीलता
'शुक्लांची' नटवी मुलायम तऱ्हा जी साधते, 'गं. त्र्य. मा.'
'गं. दे. खा.' मधली खरी हृदयता वाटे कुणाला रमा

वागर्न्तेच खरी परंतु असतीं भिन्न स्वभावी जन
वाग्देवी चरणी अमान्य न कुणी" तू बोलली हांसून

---

ता.

## साहित्यंपरिमाष्टि....

२५

"'काव्याचेही तसेच ' बीं ' तर कुणा मोहे 'शशीशेखर'
'मंजूमाधव–जुलियन' तर कुणा 'नागेश शास्त्रीस्वर'
कोणाला रुचते 'गिरीश यशवंताचे' कलावैभव
कोणी त्या 'वनवासि' 'बी'त रमती शब्दामधें लाघव "
केलें खंडन तूं विचार ' प्रमिलें ' मांडून माझें मत
त्यावेळीं निरुपाय होवुनि तुला मी जाहलो सम्मत
दृष्टी व्याकुळ ' मामू क्षमस्व ' वदण्या नैनाकडे लागली
पश्चात्ताप बघून पूर्वकृतिचा देवी मला पावली
वाणी मजुनिनादिनी गुणखनी मन्मूढता लोपवी
प्रेमाचे नवगीतगान मनिषा निःशब्द, संतोषवी
स्वर्गीचा सुखलाभ रोज मिळणें जेथें तुझ्या संगती
वादीं तन्मय रंगता सहजची लोपे क्षणाची स्मृती

काव्याच्या परिशीलनात निघुनी जावें दिनानूदिन
साहित्यं परिमाष्टि मानसमलं संसारकर्मोद्भवम्

---

### प्रकरण अकरावें.

## भूत--वर्तमान.

२६

अर्धा शैल चढून आपण उभे उलंघुनी हे कडे
रस्ता या पुढचा कुठें ! जरी दिसे जाणार कोणीकडे
श्वेतः गर्द धुकें गराडुन पहा खाली वरी मातलें
मृत्यूचें अनिवार संकट किती आतावरीं साहलें

झालो पास ‘ कलानिपूण ’ पहिल्या वर्गांत अभ्यासुन
प्रेमाचें जरि मोह भोंवति तरी तात्काळ तें विंधुन
कोणाच्या हुकुमामधें न जगणें मायाभिमानी मन
स्वातंत्र्यप्रिय जन्मबुद्धि तिजला वाटे नको बंधन
प्रीतीचा हृदयांतला न सुकला निश्यंद तो शाबूद
भूगर्भांतिल जी खरी झरि असे ती कां कधी शोषत

केलें शिक्षण पूर्ण–येत असतां झेपावुनी संकटें
एका मागुन एक आजहि उभी–आहे धृती तीं कुठें ?

---

## विनाशी वैभव.

६७

“ राहू पर्णकुटींत आणि मिळवू पोटा पुरेसें तिथें
प्रीतीची रसलीन गात रुचिरा गीतें तशी संहिते ”
“ हे राहो सखया परंतु स्मरुया स्वर्गस्थ नारायण
ज्याच्या पूर्ण कृपेंत पार पडलों दोघेहि दिव्यांतून ”
देवाच्या वरचीं अशी बघुनिया निष्ठा तुझी निश्चळ
आश्चर्याकुल वृत्ति होऊन म्हणे मी काय ही प्रेमळ !
कॉलेजामधली तरुण तरुणी सारी पुरी नास्तिक
हीं त्याला अपवाद, सूज्ञ विदुषी आहे सुधी आस्तिक
“ माझे ना घरदार बन्धु भगिनी, आई तशी जन्मदा
देवांच्या दुनियेंत तूच अवघीं माझी प्रिये संपदा

गेला ठेवुन तो पिता जरि मला लक्षावधीं तें धन
चुलत्यानें कपटीं हिरावुन मला केलें पुरे निर्धन

---

नोंद नं.
ठाणे,

## दुःखाचा अतिरेक.

२८

आला कंठ भरून आणि जमली मल्लोचनीं आसवें
आईची मधुरस्मृती न विसरे त्रिकाळ काळासवे
दुःखग्रस्त मला तुला न बघवे शत्रूचिही दुर्दशा
वैत्याच्या गुणवर्धनास्तव तुझ्या निर्लेप एकादशा
धीर वृत्ति तुझी विलोकुन म्हणे देवाधिदेवा मला
दे शक्ती सहण्यास संकट महा पावून या निर्बला
माझ्या दुःखसुखांत आजवर मी नाहीं तुला चिंतलें
पश्चात्ताप विरक्त अंतर आतां झालें दयेच्यामुळें
दुःखाचा अतिरेक चित्ति घडतां होतो सुखःसंभव
झाले दग्ध समस्त क्लेश उठलों पालांडण्याला भव
तूं नेलें अति आग्रहें स्वसदनीं आप्तामध्यें आपल्या
होतां सांप्रत ती स्मृती चहुंकडे अंधार वाटे मला

निश्वासें तुझिया समस्त सदनीं संतोषतां पालवें
दारिद्र्याकिंत त्रस्त मानसरुची दुःखामधें हांसली

---

### प्रकरण बारावें.

## सृष्टीची विविधता.

२९

सर्वांना मम आगमें बहुविधा आनंद कां जाहला ?
याची जाणिव कल्पना न मजला किंतू खरा वाटला
" केलेले उपकार सज्जन मनीं ना ठेवतीं राहती "
तूं माते अनुलक्षुनी वितरिलें सत्बोल माते प्रती
प्रेमाचा सहवास रम्य मिळतो तें गेह चेतोहर
मातीमोल धनादि सर्वच सुखें प्रीती जिथें नश्वर

नित्य स्पर्ष मिळे जिथें मज तुझा ऐकावयाही स्वर
स्वर्गाहूनहि थोर तें स्थळ, तिथें राहीन मन्वंतर
आनंदप्रद तें कितीतरि असें खेड्यांतलें जीवन
रानांतून प्रसन्न चित्त फिरणें अन् गर्द राईतून
वेगें फेनकण: प्रसार नदीचा घर्षून येई ध्वनी
दोघें शुद्ध विनोद बोलत तिथें जावें त्वरें धावुनी

सृष्टिच्या रचनेतली विविधता प्रत्यक्ष आलोकनीं
लोपे तर्कवितर्क निर्मळ मिळे सत्सौख्य सायंतनी

---

## ना हस्तधृत दैव.

३०

वृक्षाच्यावरतीं संकपित चढें गंधोध्दता वल्लरी
अन्योन्य प्रिय संगमात सगळीं आहे बरें माधुरी
ऐसे भाषण ऐकुनी तुज म्हणे कीं गोष्ट आहे खरी
कां येईल शशी नभांगणि जरी तेथें नसे शर्वरी
जें जें अंतरिचें असेल गुज तें तूं मीं तिथें बोलणें
त्यांचीं साध्य असाध्यतां समसमा दोघानिहीं हेरणें
माझा मीं इतिहास बाळपणचा, अज्ञात गोष्टी तुला
सांगाव्या, रुचुनी म्हणालिस अहो यांतो खऱ्या निस्तुला
भानूची प्रखर द्युती बरसता यावीं तुला म्लानतां
पुष्पाहून तुझीं मुलायमतनू अन् मी म्हणावें तुला
तारुण्योद्धत कामिनीसव कुणी जातां विहारावया
होतें पूर्व सई, खरोखर अशी होतीस तूं निस्तुला

ना हस्त घृत दैव कारण पडे ही स्वैर सृष्टी अशी
निश्वास प्रलयामुळें बुडतसें मत्सौख्य तत्त्वासह

## प्रकरण तेरावें.

# आणभाक आणि क्रीयमाण्.

३१

जायांचा दिन पातला भ्रमभरें ओथंबलें अन्तर
आतां अप्रिय लांबणार म्हणुनी दोघांतलें अंतर
धन्दा काहि तरी करीन बसतां तेथें जरासा जम
मी येईन-पुन्हां; नको रडु गडे होतो न चिंताश्रम
दोघांची उपजीविका जवरिना होइ स्वयंनिर्मित
आहे पूर्ण हितावही निवसणें सत्प्रेम या मैत्रित
तूं तें हें पटलें सुनिर्मल मनें जाया दिली सम्मती
होणाऱ्या विरहामुळें तरि तुझी वेडावली गे मती
केला निग्रह राहण्या विनविलें, तूं ब्रह्मचर्याश्रमी
एकांती मग मी तुला सुचविलें, "होवूं नको तूं श्रमी
मी येईन फिरून आणि वरुनी नेईन माझ्या घरीं"
तूं निर्धार करून तोवर रहा, आशा असें धावरी

तेव्हां प्रेम निदर्शनास्तव तुझ्या हस्तामधें मुद्रिका-
घालोनी वदलो, अखंड अपुले हे प्रेम राहील का !

---

## प्रकरण चवदावें.

# देवाच्या घरीं.

३२

हां आलों परतून आतुर मनें मी चक्रवाकासम
वर्षां पूर्विल प्रेम आज हृदयीं होतें तसें कायम
होतें प्राप्त सखे म्हणूनच तुला सोडून गेलों बरें
होतां काम तसाच धावत इथें भेटावया ये त्वरें
तारुण्यातिल मी मुषाफर नवा तूही जवानी खनी
आहे खेळत बेगुमान शरीरी उच्छाह सायंन्तनी

या भेटीत तुला समर्पुन कुडी उत्फुल्ल मुक्तांबुज
आश्चर्याकुल मी करीन, असल्या तंद्रीत मत्तगज
' आई ' स्फूंदत आत काय बसली दारांत ' लीला ' बसे
डोळे मोहरले उदास मुख कां झाले हिचे हें असे !
" लीले ताई कुठे ! " सकंपित रवें प्रष्णापिता मी तिला
" देवाच्या घरि " उत्तरून अवचित् टाहो तिनें फोडला

स्वार्थी मी धरुनी स्वइष्ट अपुल्या स्वप्नामधें रंगलों
गेल्या आटुन आज, सिंधु सरिता प्रत्यक्ष सृष्टीतल्या

---

## प्रकरण पंधरावें.

# परित्याग.

### ३३

प्रेमाचें बिसतंतु गुंफुन किती तूं मी बरें नाचलो
आतां मात्र अशेष तूं, इथ उभा मी एकला राहिलों
दृष्टी बावरती तुला चहुंकडे धुंडावया पाहते
तूं नाहींस, असो सुरम्य स्थळतें दृष्टीस दोषाई ते
माझा प्राण नसे घरांत म्हणुनी निर्जीव झाली कुडी
स्वर्गाचें चिरसौख्य जिंकिन अशी होती मनाची उडी
ताराह्यां बघती हळू मजकडे शीतप्रभा वर्षती
भासे खिन्न तथापि अंबर मला कैदासिणी कौमुदी
बाह्यसृष्टि सुधा नदें सजिवता माझी मृती कायम
फासा टाकुन कां मला तवघरीं नेशी न देवा यम !
शब्दे एक जिच्या निराषमन हें उन्मार्गगामी बने
ती कोठें प्रीय देवता न दिसते आशेवरी पोहणें

दृष्टीला पडतें भयाण भवती रेताड मैदान हें
झाली शोष नदी न बिन्दुहि इथें चाखावयाला वहे

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## अधःपात.

३४

प्रीती ह्या हृदयीं तुडुंब भरली ती खोल अन् निस्सिम
गे ! त्याचा उपयोग काय, विरता ही प्राणज्योती मम
वाहे स्रोत खट्याळ, धूळ उडवी वायूविचीं चंचळ
माझ्या कां ! हृदयातलीच जडतां आहे अशीं निश्चळ
पाहीं मी दिवसां नव प्रगतिचें ह्या सृष्टिचें नर्तन
रात्रीं हाय ! तुझीच तस्बिर पुढें चाले जलःसिंचन
पूर्वेचें उघडून दार पडतां बाहेर ईषाक्ष तो
भूपाळीं करण्या प्रबोधन तुझें पक्षासवें गुंजतो
खोलीतील अशी न वस्तु इथलीं जी दे तुझी विस्मृती
विश्वातील अफाट वस्तुत दिसे मातें तिहीं आकृती
पूर्वींचे स्मरती प्रसंग सगळे, मिथ्या न जा शर्वरी
मुक्तावाचुन शुक्ति ती निरखिता, कल्लोळतें अंतरीं

चितृशक्ती नुरली सखी जर नसें माझ्यासवें संगती
ईर्षेचीहि सरेल धाव दुबळी होईल सारी गती

---

## कालचें काव्य आणि आजचें अमंगल.

३५

भूगोलावर काळिमा पसरला आंक्रंदती मेघ तें
देवांची वर दुंदुभीहि मधुनी वाजें, तशी नाचतें
चंपा, वायु घरासवें झगडतों बारीं पहा खड्खडे
गारांचे वरूनीं पयोद इकडे वर्षावती अन् खडे
जैसे बाह्य जगांत वादळ तसे या भग्न चित्तामधें
हां आतील विकार सिंधु खवळे फोडोनिया हृत्तटें

आशांचें अवशेष अल्प फुटकें आले कडेला तसें
ज्यां पाहून मनास ये क्षणभरी दुःखामधेही हसें
मागे ताजमहाल भव्य रचिला आशांचिया आपण
दुर्दैवें अपघात होवुन पडे निशेःष तो भंगुन
पूर्वीचें सगळेचि लोपुन अतां पाया दिसे केवळ
हाती घेवुन शैल एक तिथला मी बैसलों व्याकुळ

त्या शैलावर पुर्ववैभव दिसें अस्पष्टसें लोचनां
त्या शैलावर आजचेहि दिसतें दुर्दैव माझ्या मनां

---

## उन्मीलत्य चिरं....

३६

उच्छाहा! न विचार मंथन करू चित्तामधें झोंप घें
जाता प्रेम मनातलें मन तुझें कैसे बळावू बघे ?
वृत्तीची रस म्लानता न सरली माझी. धृती ही वृथा
कोणाच्या करतां निरर्थ करशी उत्पन्न दर्पप्रथा ?
मृत्यो ! भीषण रूप दावुन चळ सृष्टीस संव्हारशीं
या साऱ्या जगतीतलावर बळें सांम्राज्य संस्थापिशीं
हा राजा नि दुजा गरीब तुजला ठावा नसे दंडक
कां मातेंच असां ! इथें कुढविशी, मी जाहलों शांसक
जे गेलेच करांतुनीं निघुनिया त्या भूत काळामधें
तें हातीं गवसेल काय फिरूनी ! हीं सत्यता शोक दे

दुर्दैवा ! नच नांदुनी मज दिले कां रे सुखानें भवीं ?
उन्मीलत्यचिरं निमिलति चिरं जिवप्रसून भुवि

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५७९

REFBK-0002576
REFBK-0002576